स्वप्नवत वाटचाल एका ध्येयवेड्या तरुणाची

>> पान 2

नागपूर स्किल सेंटर केवळ नागपुरातीलच नाही तर विदर्भातील लाखो युवकांच्या रोजगाराचे स्वप्न साकार करेल- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

>> पान 3

युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्यासोबत जयश्रीताई शेळके यांची चर्चा

>> पान 4

**सुविचार**

जीवनात सचोटी राखा.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 90 ■ रविवार, दि. 02 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



**धर्मेंद्र मुंबईत रुग्णालयात दाखल, अभिनेत्याच्या कुटुंबाने प्रकृतीच्या अफवांना ब्रेक लावण्याचे केले आवाहन...**

आतील पान

# आंध्र प्रदेशातील व्यंकटेश्वर मंदिरात चेंगराचेंगरी

## मृतांमध्ये बहुतांश महिला, एकादशीला जास्त गर्दीमुळे रेलिंग कोसळली

**दहा जणांचा मृत्यू**

आंध्र प्रदेश : आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यात काशी बुग्गा वेंकटेश्र्वर स्वामी मंदिरात झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत नऊ भाविकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. कार्तिक महिन्यात एकादशीच्या शुभ मुहूर्तावर ही घटना घडली, जेव्हा मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी जमली होती. मंदिर संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढली, ज्यामुळे घबराट निर्माण झाली आणि चेंगराचेंगरी झाली.



गर्दीने अनेक लोक खाली पडले आणि चिरडले. माहिती मिळताच प्रशासनाने मदत आणि बचाव कार्य सुरू केले. जखमींना जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे की सकाळपासूनच मंदिरात गर्दी लक्षणीयरीत्या वाढली होती आणि पुरेशा सुरक्षा व्यवस्थेअभावी परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. स्थानिक प्रशासनाने या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू म्हणाले की, श्रीकाकुलम जिल्ह्यातील काशीबुग्गा वेंकटेश्र्वर मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीमुळे झालेली जीवितहानी अत्यंत दुःखद आहे. मी मृतांच्या कुटुंबियांबद्दल माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करतो. मी अधिकाऱ्यांना जखमींना सर्वोत्तम उपचार देण्याचे निर्देश दिले आहेत. मी स्थानिक अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना घटनास्थळी भेट देऊन मदत

# ..तर त्यांना दिसतील तिथे फोडून काढा

## राज ठाकरेंचा मतदार यादीतील घोळावरून कार्यकर्त्यांना आदेश!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार आता राज्य निवडणूक आयोगही कामाला लागला आहे. मात्र, न्यायालयाच्या आदेशानंतर विरोधी पक्षांनी मतदार याद्यांमधील घोळाचा मुद्दा उपस्थित केला आहे. हे घोळ संपल्यानंतरच निवडणुका घ्या, अशी मागणी महाविकास आघाडीकडून करण्यात आली आहे. याच मागणीसाठी आज मुंबईत महाविका आघाडीसह सर्व विरोधी पक्षांनी 'सत्याचा मोर्चा' काढला. या मोर्चामध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरेही सहभागी झाले होते. यावेळी राज ठाकरेंनी आपल्या भाषणात खळ्ळखट्याक् करण्याचं आवाहन कार्यकर्त्यांना केले.

फॅशन स्ट्रीटपासून मुंबई महानगर पालिका भवनापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चा संपल्यानंतर झालेल्या सभेत राज ठाकरेंनी मतदार याद्यांमधील गोंधळावरून निवडणूक आयोगाला खडे बोल सुनावले. ''आम्ही




बोलतोय, उद्धव ठाकरे बोलतायत, शरद पवार बोलतायत की याद्यांमध्ये दुबार मतदार आहेत. शेतकरी कामगार पक्षही बोलतोय, कम्युनिस्ट पक्षाचे लोक बोलतायत, काँग्रेसचे लोक बोलतायत. एवढंच नाही, भाजपाचेही लोक बोलतायत की दुबार मतदार आहेत. शिंदेंचे, अजित पवारांचेही लोक बोलतायत. अरे मग अडवलं कुणी? मग हे निवडणूक घेण्याची घाई का करत आहेत? साधी गोष्ट आहे. मतदारयाद्या साफ करा. त्यानंतर जेव्हा निवडणुका होती, त्यात यश-अपयश सगळ्या गोष्टी मान्य असतील'', असं राज ठाकरे म्हणाले.

दरम्यान, येत्या निवडणुकांमध्ये जर दुबार मतदार दिसला, तर तिथल्या तिथे बडवून काढा, असं आवाहन राज ठाकरेंनी उपस्थित कार्यकर्त्यांना केलं. ''जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याद्यांवर तुम्ही सगळे काम करा. चेहरे कळले पाहिजेत. जर त्यानंतर हे दुबार-तिबारवाले आले, तर तिथेच फोडून काढायचे. बडव बडव बडवायचे आणि मग पोलिसांच्या हातात द्यायचे. त्याशिवाय हे वठणीवर येणार नाहीत'', असं राज ठाकरे म्हणाले.

मतदार याद्यांमध्ये अनेक बनावट मतदार, दुबार मतदान करणारे मतदार असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. खुद्द लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यापासून आदित्य ठाकरे, राज ठाकरे यांनीही वारंवार यासंदर्भात विविध प्रकारची कागदपत्रे दाखवून दावे केले आहेत. त्यानंतरही सत्ताधाऱ्यांकडून पुराव्यांची मागणी केली जात आहे. त्यावर राज ठाकरंनी आपल्या भाषणात चक्क गठ्ठ्यांचा एक ढीगच पुराव्यादाखल दाखवला. हे सगळे दुबार मतदार असल्याचं राज ठाकरे म्हणाले. काही मतदारसंघांची यादीही यावेळी राज ठाकरेंनी वाचून दाखवली.

### सत्तेचा गैरवापर होतोय; सत्याचा मोर्च्यातून शरद पवारांचा गंभीर आरोप

**मुंबई/प्रतिनिधी** : सत्याचा मोर्च्याची भव्यता पाहता शरद पवारांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली. त्यांनी भाषणाला सुरुवात करताच म्हणाले की, आजच्या मोर्चाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण करुन दिली. संयुक्त महाराष्ट्रावेळी असे मोर्चे निघाले होते. काळा घोडा परिसरातील मोर्चे विशेष होते. शरद पवार पुढे म्हणाले की, त्यानंतर आज तुम्ही सगळ्यांनी जबरदस्त एकजूट दाखवली आहे. आता लोकशाही, संविधानाने दिलेला अधिकार जतन करण्याची वेळ आली आली. कारण सरकार सत्तेचा गैरवापर करत असल्याचा गंभीर आरोप शरद पवारांनी यावेळी केला. या मोर्च्यातून शरद पवारांनी सर्वपक्षांना आवाहन केलं आहे. ते म्हणालेत की, आपण स्वत:साठी काहीही मागत नाही. आपण एवढंच म्हणतो आहोत की लोकशाहीत संविधानाने जो अधिकार आपल्याला दिला त्याचं जतन करण्याची वेळ आली आहे. निवडणुका झाल्या आणि त्या निवडणुकीमध्ये विशेषत: विधानसभा निवडणुकीत जे काही झालं त्यामुळे सामान्य माणसाचा संसदीय लोकशाहीवर जो विश्वास होता त्याला धक्का बसला. आज अनेक ठिकाणी लोक अस्वस्थ आहेत. सत्तेचा गैरवापर सातत्याने केला जातो आहे.

### ...पुरावे दाखवत असतील तर निवडणूक आयोगाने गांभीर्याने विचार करावा; मंत्री संजय शिरसाट यांचा घरचा आहेर



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** मनसे आणि महाविकास आघाडीचा निवडणूक आयोगाविरोधातील 'सत्याचा मोर्चा' शनिवारी मुंबईत पार पडला. चर्चगेटपासून या मोर्चाला सुरुवात झाली. आझाद मैदान येथे या मोर्चाचा शेवट झाला. या मोर्चासाठी राज्याच्या विविध भागांतून हजारोंच्या संख्येने सर्वपक्षीय कार्यकर्ते मुंबईत आले होते. तर आता मुंबईतील 'सत्याचा विराट मोर्चा'वरून राजकीय वातावरण तापले आहे.

मतदार याद्यांची छाननी व्हायला पाहिजे : ''दुबार मतदाराबाबत पुरावे देत असतील तर निवडणूक आयोगाने गंभीर्याने दखल घेतली पाहिजे. निवडणूक घ्यायची की लांबवायाची याबाबतही तातडीने निर्णय घ्यायला पाहिजे. लोकांचा आक्रोश असेल, लोकांना वाटत असेल तर मतदार याद्यांची छाननी व्हायला पाहिजे, आमचा विरोध मोर्चालाही नाही, मागणीलाही नाही, निर्णय घेण्याचे अधिकार निवडणूक आयोगाला आहेत,'' अशी प्रतिक्रिया मुंबईतील मोर्चाबाबत सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

सत्ता नसताना असे बोलणे सोपे आहे : महाविकास आघाडी एकत्र दिसली त्यांना शुभेच्छा आहे. निवडणुकीत पाहू अशी प्रतिक्रिया महाविकास आघाडीतील नेते एकत्र आल्याबाबत शिरसाट यांनी दिली. ''शरद पवार पन्नास वर्षानंतर बोलत आहेत ही आश्चर्यची गोष्ट आहे. सत्ता असताना विचार केला नाही, सत्ता नसताना असं बोलणं सोपं आहे,'' अशी टीका शिरसाट यांनी शरद पवार यांच्यावर केली. मतचोरांना धडा शिकवावा, लोकसभेत ज्यांनी मते चोरली त्यांनाही धडा शिकवा, आम्ही हाडाचे कार्यकर्ते आहोत, मतदारांच्या भरवश्यावर निवडणुका जिंकू असेही शिरसाट म्हणाले.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीला दिले ५०० कोटी : मंत्री संजय शिरसाट यांचा नांदेडमध्ये नागरी सत्कार ठेवण्यात आला होता. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेला ५०० कोटी रुपये दिल्याबद्दल नांदेडमध्ये भव्य नागरिक सत्कार करण्यात आला. यावेळी शासकीय विश्रामगृह येथे कार्यकर्त्यांची आढावा बैठक देखील घेण्यात आली.

### मुंबईत राजकीय रणकंदन पेटले! विरोधकांच्या 'सत्याचा मोर्चा'ला भाजपचे 'मूक आंदोलन' करत जशास तसे प्रत्युत्तर

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आणि मतदार यादीतील मोठ्या गोंधळावर आक्षेप घेत, आज (दि. १) मुंबईत महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने 'सत्याचा मोर्चा' काढण्यात आला. या मोर्चाला प्रतिउत्तर देण्यासाठी भारतीय जनता पक्षाने त्याचवेळी गिरगाव चौपाटी येथे 'मूक आंदोलन' केले. त्यामुळे मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापलेले दिसले.

निवडणूक आयोगाच्या निर्णयांविरोधात आयोजित या मोर्चात मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे नेते शरद पवार, काँग्रेसचे वरिष्ठ नेते, तसेच युवा नेते आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांच्यासह अनेक दिग्गज सहभागी झाले. शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि मनसे या चार प्रमुख पक्षांचे नेते एकाच व्यासपीठावर एकत्र आल्याने या मोर्चाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले गेले होते. विरोधकांच्या या शक्तीप्रदर्शनाला प्रत्युत्तर म्हणून भाजपने गिरगाव चौपाटीवर 'मूक आंदोलन' केले. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांच्यासोबत मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री आशिष शेलार, आमदार योगेश सागर, आमदार विद्या ठाकूर आणि प्रवक्ते नवनाथ बन यांच्यासह अनेक नेते सहभागी झाले. भाजपने हे आंदोलन ''महाविकास आघाडीच्या दुटप्पी राजकारणाविरोधात'' असल्याचे स्पष्ट केले. दुपारी १ वाजता सुरू झालेले हे आंदोलन शांत आणि मूक स्वरूपात पार पडले.

मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मूक आंदोलनादरम्यान विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडले. ''एकदा अशी रणनिती चालते, पण वारंवार तीच तीच 'स्ट्रॅटेजी' आता चालणार नाही,'' असे ते म्हणाले. लोकांचा पाठिंबा आता विरोधकांच्या बाजूने नाही, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकासाच्या बाजूने आहे, असे लोढा म्हणाले.

# पुढील आठवड्यात नगरपालिका निवडणुकीची घोषणा होणार, २१ दिवसात प्रक्रिया पार पडणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : पुढील आठवड्यात नगरपालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील २४६ नगरपालिका, ४२ नगरपंचायतीची निवडणूक पार पडणार आहे. २१ दिवसात निवडणूक प्रक्रिया पार पडताना तात्काळ दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची सुद्धा घोषणा निवडणूक आयोगाकडून केली जाऊ शकते. तर शेवटच्या टप्प्यात महापालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे.**

दरम्यान, महापालिका, नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तीन टप्प्यांत पार पाडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपालिका आणि पंचायतीच्या निवडणुकीसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची घोषणा सोमवारी किंवा मंगळवारी केली जाण्याची शक्यता वर्तविली जाते. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू होईल.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ ते २० जानेवारी २०२६ च्या आत घेण्याचा घेण्याचा आयोगाचा प्रयत्न राहणार आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना किंवा मतदानानंतर लगेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. अतिवृष्टी आणि पुरामुळे सरकारी यंत्रणा अजूनही ग्रामीण भागातील मदतकार्यात गुंतलेली आहे. त्यामुळे या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. जिल्हा परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरु असतानाच महापालिका निवडणुकांची घोषणा होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ ची मुदत दिली आहे. निवडणुकीच्या दरम्यान किंवा नंतर न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिका निवडणुका मुदतीपूर्वी १० दिवस आधी पार पाडल्या जातील, असे सूत्रांनी सांगितले.




महाराष्ट्रात अतिवृष्टी व पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसह सामान्य नागरिक त्यातून आतासे सावरत आहेत. त्यातच काही भागात गेल्या आठ-पंधरा दिवसांत मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. या पार्श्वभूमीवर आधी जि. प. निवडणूक घ्यावी का याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संमिश्र मते व्यक्त केली. अतिवृष्टीग्रस्त भागातील जिल्हाधिकाऱ्यांनी लगेच जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक घेण्यासारखी स्थिती नाही असे मत नोंदविले. या पार्श्वभूमीवर नगरपालिकांची निवडणूक आधी होईल. याबाबतची घोषणा पुढील आठवड्यात होण्याची शक्यता आहे.




>> पान २

## स्थिरतेमुळे अर्थव्यवस्थेत वाढ...

भारताच्या विदेशी गंगाजळीत नोंदवण्यात आलेली लक्षणीय वाढ, भारतीयांचे दरडोई उत्पन्न येत्या वर्षात ४.६३ लाख रुपयांवर पोहोचण्याचा सकारात्मक अंदाज आणि ट्रम्प यांनी भारताबरोबर व्यापार करार करण्याबाबत दिलेले संकेत, या अर्थजगतातील तिन्ही महत्त्वपूर्ण घडामोडी भारतगौरवाचीच साक्ष देणाऱ्या... भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताची विदेशी गंगाजळी ४.५ अब्ज डॉलर्सने वाढून ७०२ अब्ज डॉलर्सच्या वर पोहोचली आहे. गंगाजळीत झालेल्या या लक्षणीय वाढीमुळे भारत जगातील सर्वाधिक गंगाजळी असलेल्या पाच देशांपैकी एक ठरला आहे. विदेशी गंगाजळीत सोन्याचा हिस्सादेखील मोठ्या प्रमाणात वाढला असून, तो आता १०८.५४६ अब्ज डॉलर्स इतका झाला आहे. गेल्या काही महिन्यांत रुपयाचा दर तुलनेने स्थिर राहिला असून, आयात खर्च नियंत्रित झाला. विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय रोखे आणि शेअर बाजारात गुंतवणूक केल्याने गंगाजळीत वाढ झाल्याचे मानले जाते. विदेशी गंगाजळी ही देशाच्या सुदृढ वित्तीय आरोग्याचे प्रतीक असते, तसेच जागतिक विश्वासाची ती साक्षही असते. भारताची अर्थव्यवस्था आता स्थिर झाली असून, जागतिक पातळीवरील अनिश्चितताही तिच्या वेगाला थांबवू शकत नाही, हे आता सिद्ध झाले आहे. ही वाढ सरकारच्या आणि मध्यवर्ती बँकेच्या संतुलित धोरणांमुळे झाली, असे निश्चितपणे म्हणता येते. विनिमय दरातील स्थैर्य, नियंत्रित महागाई आणि व्यापार तुटीवर मिळवलेले नियंत्रण यामुळे भारताच्या गंगाजळीत वाढ झालीच, त्याशिवाय जागतिक गुंतवणूकदारांचा विश्वासही तिने संपादन केला आहे. अन्य एक महत्त्वाची घडामोड म्हणजे, भारताचे दरडोई उत्पन्न येत्या वर्षात ४.६३ लाख रुपयांवर पोहोचेल, असा अंदाज एका अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. २०१४ मध्ये हे उत्पन्न सुमारे ८६ हजार, ६६० रुपये इतकेच होते. गेल्या दशकात भारतीय नागरिकांच्या सरासरी उत्पन्नात जवळपास पाचपट वाढ झाली आहे. विशेष महत्त्वाचे म्हणजे, ही वाढ केवळ उच्चवर्गापुरती मर्यादित नसून, ग्रामीण भागातल्या वेतनदरात, स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये आणि महिलांचा कामकाजातील वाढलेला सहभाग यात झालेली वाढ या सर्व घटकांनी मिळून भारताची आर्थिक पायाभरणी अधिक व्यापक केली आहे. उद्योग, सेवा आणि डिजिटल क्षेत्रात निर्माण झालेल्या नव्या रोजगारसंधीमुळे भारतात कामगार ते ग्राहक असा संक्रमणकाळ सध्या अनुभवण्यास मिळत आहे. ई-कॉमर्स, फिनटेक, पर्यटन आणि उत्पादन या क्षेत्रांतल्या वाढीने उपभोगशक्तीला चालना दिली आहे. सरकारच्या 'सबका साथ, सबका विकास' या धोरणाला अनुसरून राबवलेल्या 'प्रधानमंत्री आवास योजना', 'जनधन-आधार-मोबाईल' ही त्रिसूत्री आणि 'पीएम किसान सन्मान निधी' यांसारख्या योजनांनी कुटुंबांचे आर्थिक सक्षमीकरण घडवून आणले आहे. म्हणूनच, आर्थिक वाढ ठराविक भागापुरती मर्यादित न राहता, समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी नुकतेच असे म्हटले आहे की, ''मला पंतप्रधान मोदी यांच्याबद्दल प्रचंड आदर असून, मी भारतासोबत व्यापारी करार करणार आहे.'' ट्रम्प यांनी भारतीय आयातीवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लादले आहे, तरी आज ते भारतासोबत व्यापारी करार करण्यासाठी अधिक आतुर दिसून येत आहेत. अमेरिकेचे हे बदललेले धोरण भारताच्या जागतिक प्रतिमेतील बदलाचेच प्रतीक ठरले आहे. गेल्या दशकात भारताने निर्णायक आर्थिक शक्ती म्हणून आपली ओळख प्रस्थापित करतानाच, धोरणात्मक विश्वासार्हताही कमावली आहे.अमेरिका, युरोप, जपान आणि पश्चिम आशियाशी वाढलेले व्यापार आणि तंत्रज्ञान सहकार्य हे त्याचेच पुरावे. भारत आता विश्वसनीय भागीदार आणि स्थिर बाजारपेठ म्हणून ओळखला जातो. ट्रम्प यांचे विधान हे म्हणजे वैयक्तिक कौतुक नव्हे; तर ते भारताच्या धोरणात्मक आणि आर्थिक विश्वासार्हतेचे आंतरराष्ट्रीय प्रतीक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक शिस्त, उत्पन्नात तसेच क्रयशक्तीत झालेली वाढ आणि जागतिक विश्वास यांचा एकत्रित परिणाम म्हणून या तीन घटनांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. विदेशी गंगाजळी वाढली असल्याने, येणाऱ्या काळात भारताचा रुपया स्थिर राहील, महागाईही नियंत्रणात राहील आणि विदेशी कर्जाचा धोका कमी होईल. दरडोई उत्पन्नात झालेली वाढ देशांतर्गत मागणीला चालना देईल, गुंतवणूकदारांना नवीन बाजार उपलब्ध होईल. तसेच जागतिक राजकारणात भारताविषयी वाढलेला विश्वास येणाऱ्या काळात जागतिक पुरवठासाखळीत भारत हा मध्यवर्ती भूमिकेत असेल, याचेच द्योतक. तसेच भारताचा वाढीचा दर सध्या सात टक्क्यांच्या आसपास असून, तो जी-२० देशांमध्ये सर्वाधिक आहे. चीनचा दर ४.५ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिला असून, युरोप मंदीच्या उंबरठ्यावर उभा आहे. नाणेनिधी, जागतिक बँक आणि 'मूडीज' यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी भारताला जगाच्या वाढीचे इंजिन म्हणून गौरवले आहे. विदेशी गुंतवणुकीसाठी देशातील स्थिर धोरणात्मक वातावरण, उत्पादन क्षेत्रातील 'मेक इन इंडिया'ची झेप, आणि डिजिटायझेशनमुळे निर्माण झालेला पारदर्शक व्यापार हा भारताच्या प्रगतीचा पाया आहे, असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. भारतीय अर्थव्यवस्था ही केवळ उत्पादनावर अवलंबून नाही; तर ती सेवा, डिजिटल, डेटा आणि कौशल्य या नव्या स्तंभांवर उभी आहे. डिजिटल पेमेंट प्रणालीने व्यवहार सुलभ करण्याबरोबरच करआधारही वाढवला आहे. सोन्याच्या साठ्यातील वाढ देशाच्या आर्थिक सुरक्षिततेचा आणि जागतिक विश्वासाचे प्रतीक ठरली आहे. मध्यवर्ती बँकेने गेल्या दोन वर्षांत सातत्याने सोने खरेदी करून आपला साठा वाढवला आहे. महागाई तसेच अमेरिकी डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठीचा हा धोरणात्मक निर्णय आहे. जागतिक अस्थिरतेच्या काळात अनेक देश डॉलरला समर्थ पर्याय शोधत आहेत. भारताने त्या दिशेने निश्चितपणे ठोस पावले उचलण्यास प्रारंभ केला आहे. म्हणूनच, विदेशी गंगाजळीतील सोन्याचा साठा भारताने हेतूतः वाढवला आहे. दरडोई उत्पन्नात झालेली वाढ ही सामान्यांच्या जीवनात आत्मविश्वास प्रदान करणारी आहे. गेल्या काही वर्षांत मध्यम वर्गाने घरखरेदी, वाहनखरेदी, विमासंरक्षण आणि मुलांच्या शिक्षणावरील खर्चात वाढ केली आहे. बँक ठेवींमध्ये तसेच म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीत झालेली वाढ याचेच संकेत देतात. वाढलेली क्रयशक्ती उद्योगांना मागणी देते, उत्पादनात वाढ करते, रोजगार निर्माण करते आणि पुन्हा उत्पन्नात वाढ होते. हा चक्रवाढ परिणाम भारतीय अर्थव्यवस्था आता अनुभवत आहे.

# स्वप्नवत वाटचाल एका ध्येयवेड्या तरुणाची

## डोणगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी : सर्वसामान्यांचा खरा आर्थिक आधार

जगात अनेक तरुण चांगल्या नोकरीच्या स्वप्नात रममाण होतात, पण डोणगावचा ऋषांक चव्हाण हा तरुण वेगळाच ठरला. त्याचं स्वप्न फक्त स्वतःचं करिअर घडवण्याचं नव्हतं तर इतरांचं आयुष्य उजळवण्याचं होतं.

बँकिंग क्षेत्रात ''मोठ्या लोकांचा दबदबा'' असताना, एका छोट्या गावातून उभा राहिलेला हा तरुण स्वतःच्या ध्येयाने, मेहनतीने आणि लोकांवरील विश्वासाने शेकडो कुटुंबांच्या जीवनात ''सोनेरी दिवस'' घेऊन आला.

**ग्राहक सेवेतून सुरु झालेला जनतेचा प्रवास :** सन २०१७. गावातल्या छोट्या दुकानात 'डोणगाव मल्टीपर्पज ग्राहक सेवा केंद्र'चा बोर्ड लावला गेला. कागदपत्रांच्या कटकटीशिवाय, विश्वासार्ह सेवा आणि ग्राहकांशी आत्मीयतेचा संवाद हाच ऋषांकचा पाया ठरला. लोक म्हणायचे, ''ही तर आपलीच बँक आहे!'' याच अनुभवातून २०२१ मध्ये उभारली गेली 'डोणगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी'.



केवळ चार वर्षांतच ही संस्था गोरगरिबांचा आर्थिक आधार बनली आहे.

**ग्रामीण विकासाचा ठोस पाया :** ऋषांक यांनी शहरी गजबज बाजूला ठेवून गावाकडे वळण घेतले. त्यांनी शाखा उघडल्या त्या ठिकाणी जिथे लोकांनी बँक फक्त टीव्हीवर पाहिली होती. आज जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये 'डोणगाव अर्बन'चा झेंडा फडकतोय, आणि हजारो ग्राहक आत्मविश्वासाने म्हणतात ''आता आमचं भविष्य सुरक्षित आहे.''

### ग्राहकांशी जिव्हाळ्याचं नातं

डोणगाव अर्बनमध्ये ग्राहक हा फक्त ''खातेधारक'' नाही तो कुटुंबाचा सदस्य आहे. कर्मचाऱ्यांमधील आपुलकी, अध्यक्षांच्या हस्ते होणारे सत्कार, आणि प्रत्येक व्यवहारात दिसणारा सन्मान यामुळे या संस्थेचं ब्रीदवाक्य ठरलं आहे : ''विश्वास हा आमचा ठेवा, सेवा ही आमची ओळख.''

### चार वर्षांचा सुवर्णप्रवास पाचव्या वर्षात नवी उंची

चार वर्षांच्या अथक परिश्रमांनंतर आज ही संस्था पाचव्या वर्षात प्रवेश करतेय. ग्राहकांचा विश्वास, कर्मचाऱ्यांचा उत्साह आणि ऋषांक चव्हाण यांचं दूरदर्शी नेतृत्व या त्रिसूत्रीवर उभी आहे एक नवी आर्थिक क्रांती.

डोणगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी सर्वसामान्यांचा आधार... विकासाचा आधार...!''

**अत्याधुनिक सुविधा ग्रामीण भागात डिजिटल क्रांती:** डोणगाव अर्बनने काळानुरूप तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. मोबाईल बँकिंग, एसएमएस अलर्ट, क्यूआर कोड पेमेंट, साऊंड बँकिंग, गोल्ड लोन, आरटीजीएस-एनईएफटी, झिरो बॅलन्स खाते या सर्व सुविधांमुळे आज गावातही डिजिटल बँकिंगचे युग अवतरले आहे.

'सुकन्या योजना'ने तर पालकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवलं आहे केवळ एक लाख गुंतवणुकीवर अठरा वर्षांनी तब्बल आठ लाखांचा परतावा! ही योजना असंख्य कन्यांच्या भविष्यासाठी ''आशेचा किरण'' ठरली आहे.

**महिलांसाठी आणि तरुणांसाठी नवा अध्याय:** 'डोणगाव अर्बन' केवळ बँक नाही ती रोजगारनिर्मितीचं केंद्र आहे. आज शेकडो तरुण-तरुणी येथे कार्यरत आहेत. महिलांना विशेष प्राधान्य देऊन, ऋषांक यांनी ''महिला सक्षमीकरण'' या शब्दाला प्रत्यक्ष अर्थ दिला आहे. घर आणि जबाबदारी सांभाळणाऱ्या या महिला आज अधिकारी पदावर कार्यरत आहेत अभिमानाने, आत्मविश्वासाने!

**समाजसेवा हृदयातून उमटलेली प्रेरणा :** ऋषांक चव्हाण यांचं कार्य केवळ बँकिंगपुरतं मर्यादित नाही. अनाथ मुलांचं शैक्षणिक पालकत्व, पूरग्रस्तांना मदत, रक्तदान शिबिरे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आधार, विधवा व दिव्यांगांसाठी रोजगार योजना, विद्यार्थ्यांना मदत केंद्र या प्रत्येक उपक्रमातून ते ''मानवतेचं बँकिंग'' करत आहेत.

**युवकांच्या स्वप्नांना पंख :** भांडवलाच्या अभावामुळे व्यवसाय सुरू न करू शकणाऱ्या अनेक युवकांना या बँकेने बळ दिलं. कमी कागदपत्रात, जलद कर्ज सुविधा उपलब्ध करून 'डोणगाव अर्बन'ने अनेकांना ''रोजगार शोधणाऱ्यांपासून रोजगार देणारे'' बनवलं आहे.

## वेळ आली तर आम्ही..., राज आणि उद्धव ठाकरेंचा उल्लेख करत रोहित पवारांचे मोठे विधान

**मुंबई/प्रतिनिधी** :वेळ आली तर लोकशाही वाचवण्यासाठी आम्हीदेखील हातात दंडुका घेऊ असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी दिला आहे.



रोहित पवार यांनी शिवसेना कल्याण शहर शाखेत घेतली शिवसैनिकांची भेट घेतली. यानंतर संवाद साधताना त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या विधानाला सहमती दर्शवली ज्यामध्ये त्यांनी दुबार मतदारांना फोडून काढा असा आदेश दिला.

सत्याचा मोर्चामध्ये संवाद साधताना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी दुबार मतदार आढळला तर त्याला फोडून काढा असे आदेश दिले आहेत. याबाबत बोलताना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी ठाकरे बंधूंना समर्थन दिलं. वेळ आली तर लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही देखील हातात धंडूक घेऊन असा इशाराच रोहित पवार यांनी दिला आहे.

मोर्चावर भाजपाकडून होणाऱ्या टीकेबाबत बोलताना रोहित पवार यांनी भाजपाचा चांगला समाचार घेतला. रोहित पवार म्हणाले की ,''आम्ही भाजपाला काही बोलत नाही, आम्ही निवडणूक आयोगाला बोलत आहोत. लोकसभा निवडणुकीनंतर इतक्या म ोठ्या प्रमाणात नोंदणी कशी झाली त्याच्यावर आमचा आक्षेप आहे. लोकशाही टिकावी, संविधान टिकावे यासाठी रस्त्यावर उतरून लढत आहोत''.

उद्धव ठाकरे यांचे मतदार यादीमधून नाव वगळण्याचा प्रयत्न होत आहे. जर मोठ्या नेत्यांबाबत असे होते असेल तर सर्वसामान्यांबाबत काय? असा सवाल देखील रोहित पवार यांनी केला.

राज ठाकरेंनी काय म्हटले आहे?

''२३२ आमदार निवडून आल्यानंतर जर म हाराषट्रात मातब, शांतता आणि मतदार गोंधळलेले असतील, निवडून आलेल्यांना चिमटे काढून पाहत होते. त्यांची सोय आधीच झाली असल्याने त्यांना माहिती नव्हतं. त्यांनाही आपण निवडून येणार याची कल्पना नव्हती. निवडणूक आयोगाच्या मार्फत ही सगळे कारस्थाने सुरु आहेत. निवडणुका लढवायच्या कशा ते सांगा. जो मतदार उन्हात उभा राहतो त्याच्या मतांचा अपमान नाही का? मतदान कुठे जरी झाले तरी मॅच फिक्स आहे. मग मताला काय किंमत आहे,'' असा संतापही त्यांनी व्यक्त केला.

''जेव्हा कधी निवडणुका होतील, एकतर पहिल्यांदा घराघरात जा आणि याद्यावंर काम करा. चेहरे कळले पाहिजेत. ती माणसं मतदानाच्या ठिकाणी पोहोचली पाहिजेत. जर तिथे दुबार, तिबार वाले आले तर तिथेच फोडून काढायचे. बडव बडव बडवायचे आणि मग पोलिसांच्या हाती द्यायचे. त्याशिवाय हे वठणीवर येणार नाहीत. त्याशिवाय महाराष्ट्रातील कारभार वठणीवर येणार नाही,'' असेही त्यांनी सांगितले.

## हाता तोंडाला चिकटपट्टया, रोहित आर्याची ती एक गोष्ट अनब.. मुलांनी सांगितला थरकाप उडवणारा घटनाक्रम

**मुंबई/प्रतिनिधी** : पवईमध्ये गुरुवारी थरकाप उडवणारी अपहरणाची घटना घडली. रोहित आर्या नावाच्या व्यक्तीने चित्रपट निर्मितीच्या नावाखाली १७ मुलांचे अपहरण केले होते. मुलांना वाचण्यात यश आलं असून पोलिसांनी रोहित आर्याचा इनकाऊंन्टर करण्यात आला. अशातच आता या प्रकरणातून धक्कादायक माहिती समोर येऊ लागली आहे. अपहरण झालेल्या मुलांनी घडलेल्या घटनेचं वर्णन केलं आहे.

पोलिसांनी मिळवलेल्या माहितीनुसार, रोहित आर्याने माहितीपटाच्या चित्रीकरणासाठी' जाहिरात दिली होती आणि १५ वर्षांपर्यंतच्या मुलांना मुंबईत बोलावले होते. या जाहिरातीनंतर १७ मुले गुरुवारी सकाळी स्टुडिओत पोहोचली. त्यांच्या पालकांनाही सोबत येण्याची परवानगी होती. मात्र, स्टुडिओत प्रवेश करताच रोहितने 'शूटिंगदरम्यान अडथळा येईल' या कारणावरून पालकांना बाहेर थांबण्यास सांगितले. केवळ एक ज्येष्ठ महिला पालक आत राहिली. त्यानंतर अपहरणाचा थरार सुरू झाला.






DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नागपूर स्किल सेंटर केवळ नागपुरातीलच नाही तर विदर्भातील लाखो युवकांच्या रोजगाराचे स्वप्न साकार करेल– केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर स्किल सेंटर केवळ नागपुरातीलच नाही तर विदर्भातील लाखो युवकांच्या रोजगाराचे स्वप्न साकार करेल आणि विदर्भाच्या प्रगतीला गती देईल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर येथे केले केले.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) चे विदर्भ ग्लोबल फाउंडेशन, नागपूर म हानगरपालिका आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने ''नागपूर स्किल सेंटर'' या कौशल्य विकास उपक्रमाचे लोकार्पण नितीन गडकरी यांच्या हस्ते संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते .या प्रसंगी मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया 'मेत्री, एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे, प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मनपा, एआयडी आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्यात सामंजस्य करार सुद्धा करण्यात आला.

याप्रसंगी रोजगार निर्मिती बद्दल बोलताना गडकरी यांनी सांगितलं की ''उद्योग आणि कृषी क्षेत्रात विकास तेव्हाच होईल जेव्हा उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक वाढेल. त्यातून रोजगार वाढेल, प्रति व्यक्ती उत्पन्न वाढून गरीबी दूर होईल. विदर्भाच्या विकासासाठी आमचे लक्ष राज्याच्या जीडीपीमध्ये विदर्भाचा वाटा वाढवण्याकडे आहे.''

ते पुढे म्हणाले, ''विदर्भातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एआयडी व टाटा स्ट्राईव्ह यांच्यात झालेला करार कौतुकास्पद आहे. पण केवळ शहराला स्मार्ट करून होणार नाही तर ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. स्मार्ट शहरांसोबत स्मार्ट गावेही व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली . पुढील पाच वर्षात विदर्भातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रात ५ हजार युवकांना देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवावे. त्याकरिता स्कील सेंटरची भविष्यात संख्या वाढवावी, असे आवाहन गडकरी यांनी यावेळी केले .

गडकरी यांनी मिहानमध्ये आतापर्यंत एक लाख रोजगार निर्माण झाल्याचे नमूद करून सांगितले की, ''विदर्भात कोणत्या उद्योगाना कोणते कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची गरज आहे,याचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे सांगितले.

''एआयडी, टीसीआयटी आणि मनपा या तीन संस्थांच्या सहकार्याने नागपूर स्किल सेंटरची स्थापना होत आहे. पारडी येथे ३० हजार चौरस फ ूट क्षेत्रावर हे केंद्र उभे राहिले आहे. पुढील महिन्याभरात सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन जानेवारीपासून अभ्यासक्रम सुरू होतील,'' अशी ग्वाही नागपूर मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिली. नागपूरसह विदर्भात वेगाने औद्योगिक विकास होत असून त्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज भासणार आहे. ही बाब ध्यानात घेऊन हे स्कील सेंटर विक्रमी वेळेत सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



प्रास्ताविकातून एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे यांनी एआयडीच्या कार्याचा आढावा घेतला. विदर्भाच्या औद्योगिक विकासाकरिता एआयडीतर्फे विदर्भ ग्लोबल फाउंडेशनची स्थापना करण्यात आली असून त्याद्वारे विदर्भ ग्लोबल स्किल अँड लॉजिस्टिक्स युनिव्हर्सिटीची स्थापना आणि संचालन करण्याचा उद्देश आहे. भविष्यासाठी तयार कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या आणि प्रदेशात औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या दिशेने उचललेले एआयडीचे नागपूर स्किल सेंटर एक पाऊल आहे, असे ते म्हणाले.

टाटा स्ट्राईव्ह आणि मनपा यांच्या सहकार्याने दहावी–बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी हॉटेल, मेडिकल, सोलर टेक्निशियन, ईव्ही, इव्हेंट मॅनेजमेंट अशा क्षेत्रांमध्ये १० अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

'नागपूर स्किल सेंटर' हे पूर्व नागपूरच्या मौजा पुनापूर येथे सुमारे २९०३.८६ चौरस मीटर जागेवर बांधले जाणार असून या केंद्रात किमान पात्रता दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे . हॉस्पिटॅलिटी, कन्स्ट्रक्शन, सोलर टेक्निशियन, ऑटो सर्व्हिस टेक्निशियन, इलेक्ट्रॉनिक फिल्ड टेक्निशयन इत्यादी अभ्यासक्रम या केंद्रात उपलब्ध राहणार असून ७५ टक्के प्रशिक्षणार्थी हे शहरातील रहिवासी असणे बंधनकारक असणार आहे.



नवा रायपूर येथील श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयात 'दिल की बात' कार्यक्रमाचा भाग म्हणून हृदयरोगावर उपचार घेत असलेल्या मुलांशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी.

## ठाणे मनोरुग्णालयात पदव्युत्तर 'एमएस्सी इन मेंटल हेल्थ' अभ्यासक्रम सुरु होणार, अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा असणार

**मुंबई/प्रतिनिधी :** बदलत्या जीवनशैलीमुळे नागरिकांचे मानसिक आरोग्य ढासळत असून, नैराश्यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे आरोग्य क्षेत्रामधील तज्ज्ञ व कुशल परिचारिकांची आवश्यकता निर्माण होत आहे. त्यामुळे ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये 'एम.एस्सी नर्सिंग इन मेंटल हेल्थ' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम सुरू करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली असून, आवश्यक परवानगी व मनुष्यबळाची भरती केल्यानंतर पुढील वर्षीपासून हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

बदलती जीवनशैली, कामाचा ताण, कामामध्ये किंवा परीक्षेमध्ये अपयश, घरातील कुरबुरी यासारख्या अनेक बाबींमुळे नागरिकांमध्ये तणावाचे प्रमाण वाढत आहे. यामुळे अनेकजण नैराश्यग्रस्त होत आहेत. ठाणे मनोरुग्णालयामध्ये रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने डॉक्टर, परिचारिका व समुपदेशक यांची आवश्यकता वाढत आहे.

## मुंबईत जमिनीखाली १८ मीटर खोलवर भुयारी मेट्रोला मिळणार बीएसएनएलचे नेटवर्क ?

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मागील काही दिवसांपूर्वी जेव्हीआरएल–बीकेसी–कफ परेड या भुयारी मेट्रो ३ चे उद्घाटन करण्यात आले होते. मुंबई मेट्रो ३ हा भुयारी मार्ग असल्यामुळे प्रवास करताना नेटवर्कची अडचण येत असल्याने प्रवासी नाराज आहेत. यावर उपाय म्हणून प्रवाशांना सरकारी भारत संचार निगम लिमिटेडचे (बीएसएनएल) नेटवर्क मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

मुंबईतील भुयारी मेट्रो जमिनीपासून सरासरी १८ मीटर खोलवरून धावते. त्यामुळे मेट्रोमधून प्रवास करताना नेटवर्कची अडचण येणार याची कल्पना मेट्रोला होती. या पार्श्वभूमीवर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने सौदी अरेबियाच्या 'एसेस इन्फ्रास्ट्रक्चर' या कंपनीशी मोबाइल नेटवर्क सुविधा उभारणीच्या कंत्राटी तत्त्वावरील करार केला आहे. मात्र या विदेशी कंपनीच्या नेटवर्कचा मुंबईकरांना काहीच फायदा नसल्याने प्रवासी त्रस्त आहेत.

एमएमआरसीएलमधील सूत्रांनुसार, रिलायन्स जिओने एसेस इन्फ्राचे जाळे वापरून त्याआधारे नेटवर्क देण्यास नकार दिला आहे. त्यामुळेच त्यांचे नेटवर्क संपूर्ण मार्गिकेभर कुठेही नाही. एअरटेलनेही यातून काढता पाय घेतला आहे. तर 'वि' म्हणजेच व्होडाफोन–आयडीयाचे नेटवर्क भुयारी मेट्रो ३ च्या धारावी ते आचार्य अत्रे चौक या सहा स्थानकांपूरते मर्यादित आहे.

## फलटणच्या महिला डॉक्टर प्रकरणात लेडी सिंघमची एन्ट्री, तपासाची सूत्रे वेगाने फिरणार

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी :** फलटण तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरने आत्महत्या करून जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात नाही तर देशात खळबळ उडाली असून, वैद्यकीय क्षेत्रातही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित आरोपींना अटक केली असून, घटनेचा पुढील तपास सुरू आहे. डॉक्टर तरुणीच्या आत्महत्येच्या तपासासाठी महिला आयपीएस तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली एसआआयटीची स्थापन करण्यात आली आहे.

फलटणमध्ये डॉक्टर तरुणीने हातावर 'सुसाइड नोट' लिहून केलेल्या आत्महत्येचे राज्यात तीव्र पडसाद उमटत आहेत. या प्रकरणातील आरोपींमध्ये पोलिसाचाही समावेश असल्याने विरोधकांनी गृहखाते असलेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांना लक्ष्य केले. सातारा पोलिसांनी चौकशी केल्यास त्यांच्यावर दबाव राहण्याची शक्यता असल्याने या प्रकरणाची 'एसआयटी' चौकशी करावी, अशी मागणी विरोधकांनी केली होती. या डॉक्टरची आत्महत्या नव्हे, तर हत्या आहे, असा दावाही कुटुंबाने आणि विरोधकांनी केला होता. त्यामुळे पारदर्शक चौकशीसाठी 'एसआयटी' नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कोण कोण असणार या तपास समितीमध्ये?

निष्पक्ष चौकशीसाठी तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पोलिस महासंचालकांना दिले. एसआयटीची टीम लवकरच फलटणमध्ये दाखल होणार असून आत्महत्येच्या तपासाला गती मिळणार आहे. या समितीमध्ये अनुभवी पोलिस अधिकारी, गुन्हे अन्वेषण तज्ज्ञ आणि न्यायवैद्यक सल्लागारांचा समावेश आहे. या पथकाला संबंधित कागदपत्रे, पुरावे आणि तपास नोंदींचा सखोल अभ्यास करून निष्पक्ष तपास करण्याचे निर्देश दिले गेले आहेत.

काय आहे प्रकरण?

फलटण इथं २३ ऑक्टोबर २०२५ च्या रात्री उशिरा आढळला होता. फलटण उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉक्टर महिलेचा मृतदेह हॉटेलच्या खोलीत आढळला. मृत्यूपूर्वी डॉक्टर महिलेनं तिच्या हातावर एक चिठ्ठी लिहिली होती. त्यामध्ये तिने दोन व्यक्तींची नावं नम ूद केली होती. पोलीस उपनिरीक्षक (झएछ) गोपाळ बदणे, याच्यावर वारंवार बलात्कार केल्याचा आरोप तिने केला होता. तर सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या प्रशांत बनकर याच्यावर मानसिक छळ केल्याचा आरोप केला. तिने या दोघांची नावं हातावर लिहिलेली होती. या प्रकरणी दोन्ही आरोपींवर बलात्कार आणि आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.


# धर्मेंद्र मुंबईत रुग्णालयात दाखल, अभिनेत्याच्या कुटुंबाने प्रकृतीच्या अफवांना ब्रेक लावण्याचे केले आवाहन...

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचे ज्येष्ठ सुपरस्टार धर्मेंद्र यांना नियमित वैद्यकीय तपासणीसाठी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल केलं गेलं. याबद्दल आता सूत्रांनी माहिती दिली आहे. दरम्यान त्यांच्या आरोग्याबद्दलच्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये याबद्दलचं आवाहन आता केलं गेलं आहे. ८९ वर्षीय अभिनेता गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयात आहेत, धर्मेंद्र नियमित तपासणीसाठी रुग्णालयात गेले होते, यानंतर ते तिथेच राहत आहेत. सध्या त्यांच्या डिस्चार्जच्या तारखेबद्दल कोणतीही अपडेट दिली गेली नाही. त्यांचा मुलगा सनी देओल आणि बॉबी देओल यांनी त्यांच्या वडिलांच्या दु:खाच्या काळात त्यांच्याबरोबर राहत आहेत. त्यांच्या शूटिंग शेड्यूलमध्ये थोडा बदलाव आता त्यांनी केला आहे.

धर्मेंद्र नियमित वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल : दरम्यान लवकरच धर्मेंद्र डिसेंबरमध्ये त्यांचा ९०वा वाढदिवस साजरा करणार आहे. यावर्षी एप्रिलमध्ये धर्मेंद्र यांच्यावर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. तसेच धर्मेंद्र यांच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर ते शेवटी २०२४ मध्ये 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' चित्रपटात दिसले होते. या चित्रपटात मुख्य भूमिकेत अभिनेता शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन हे कलाकार दिसले होते. अभिनेता चित्रपट 'इक्कीस'मध्ये काम करणार आहे, ज्याचं दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक श्रीराम राघवन यांनी केलंय. या चित्रपटात अगस्त्य नंदा आणि सिमर भाटिया हे प्रमुख भूमिकेत आहेत. हा चित्रपट सर्वात तरुण परमवीर चक्र विजेता अरुण खेतरपाल यांच्या जीवनावर आधारित आहे.

धर्मेंद्र यांचा आगामी चित्रपट : 'इक्कीस' चित्रपटात जयदीप अहलावत आणि सिकंदर खेर देखील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर डिसेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे. बुधवारी, 'इक्किस'चा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला होता. या चित्रपटाचा ट्रेलर पाहून धर्मेंद्र यांचा मोठा मुलगा, बॉलिवूड सुपरस्टार सनी देओल,



इतक्या मोठ्या वयात वडिलांना काम करताना पाहून खूप आनंदित झाला होता, त्यानेही त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर हा ट्रेलर शेअर केला होता. आपल्या पोस्टमध्ये त्यानं लिहिलं होतं 'पापा पुन्हा एकदा रॉक करणार आहेत. छान दिसत आहेत, पापा. तुम्हाला खूप खूप प्रेम आहे. प्रिय अगस्त्य, खूप खूप शुभेच्छा, तुम्हीही रॉक कराल! वो 'इक्किस' का था, 'इक्किस' का ही रहेगा! दिनेश विजन आणि मॅडॉक चित्रपट सादर करत आहेत. 'इक्किस' भारतातील सर्वात तरुण परमवीर चक्र पुरस्कार विजेते – सेकंड लेफ्टनंट अरुण खेतरपाल यांची न ऐकलेली सत्यकथा, ज्याचे दिग्दर्शन श्रीराम राघवन यांनी केलं आहे. 'इक्किस'चा ट्रेलर आता प्रदर्शित होत आहे. डिसेंबर २०२५ मध्ये चित्रपटगृहांमध्ये!'' या चित्रपटाच्या माध्यामातून अगस्त्य हा पहिल्यांदा रुपेरी पडद्यावर धमाल करताना दिसणार आहे. यापूर्वी तो 'द आर्चीज'मध्ये दिसला होता. त्यांचा हा चित्रपट ओटीटी प्लेटफफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला होता.

## संक्षिप्त...

### पुण्यात गँगवॉरने पुन्हा डोकं वर काढलं; पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांची माहिती



**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील कोंढवा परिसरात गँगवॉरची घटना घडली आहे. आंदेकर टोळीतील समीर काळेचा भाऊ गणेश काळेचा खून करण्यात आला आहे.



गणेश काळेवर आधी गोळ्या झाडण्यात आल्या, नंतर त्यांच्यावर कोयत्याने हल्ला करण्यात आला. पुण्यातील कोंढवा परिसरात आज शनिवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला आहे. गणेश काळेचा भाऊ समीर काळे हा वनराज आंदेकर खून प्रकरणात अटकेत आहे. गणेश काळे हा रिक्षा चालक होता. त्यांच्यावर एक गुन्हा दाखल आहे. कोंढवा परिसरातील खडी मशीन चौकात दोन दुचाकीवर आलेल्या दोघांनी रिक्षातून प्रवास करणाऱ्या गणेश काळेवर ६ गोळ्या झाडल्या. यातील दोन गोळ्या गणेश काळेला लागल्या. त्यानंतर दुचाकीवरील दोघांनी गणेश काळेवर कोयत्याचे वार केले. त्यानंतर त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. गणेश काळेचं वय साधरण ३० ते ३५ वर्ष होतं. आज दुपारी तीन वाजता कोंढवा परिसरातील खडी मशीन चौकात दोघांनी गणेश काळेचा खून केला.

### पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीमध्ये मध्यरात्री पार पडले रोहित आर्यावर अंत्यसंस्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** मुंबईतील पवई इथं महावीर क्लासिक इमारतीत १७ शाळकरी मुलांना रोहित आर्य याने ओलीस ठेवलं होतं, तेव्हा मुलांची सुटका करताना ओलीस ठेवलेल्या रोहित आर्याचा मुंबई पोलिसांनी एन्काऊंटर केलाय. रोहित आर्या प्रकरणात विरोधकांकडून सत्ताधारी पक्षांवर जोरदार टीका केल्याचं पाहायला मिळता या प्रकरणात माजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचं नावदेखील पुढे येताना पाहायला मिळालं. असं असताना आज मध्यरात्री पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमी येथे पत्नी, मुलगा, मेव्हणा आणि इतर २ नातेवाईक यांच्या उपस्थितीत रोहित आर्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.आज मध्यरात्री पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीमध्ये रोहित आर्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी रोहित आर्याची पत्नी, मुलगा, मेव्हणा आणि इतर २ नातेवाईक हे उपस्थित होते. काल सायंकाळी मुंबईतील जे जे रुग्णालयामध्ये शवविच्छेदन पार पडल्यानंतर पुण्यात रात्री उशिरा पुणे पोलिसांच्या बंदोबस्तात मध्यरात्री अडीच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.दीपक केसरकर यांच्यावर देखील आरोप : रोहित आर्याप्रकरणी माजी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यावर देखील आरोप करण्यात आले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर दीपक केसरकर यांनी प्रतिक्रिया देताना सर्व आरोप फेटाळले आहेत. त्यांनी रोहित आर्यावर पैसे घेतल्याचा आरोप केला आहे.

### दिवाळीची सुट्टी ठरली अखेरची! मित्रांसोबत डोंगरावर गेला अनब क्षणात घात, अत्रिनंदनचा दुर्दैवी मृत्यू

आळंद : दिवाळीनिमित्ताने शाळांना सुट्ट्या आहेत. त्यामुळे मुलांची मज्जा सुरू आहे. दिवाळी संपली तरी फराळाची चव चाखत खेळणं बागडणं आणि फिरणं सुरू आहे. घराजवळ असलेल्या डोंगराजवळ सुट्टीनिमित्त मित्रांसोबत फिरायला गेलेला अत्रिनंदन घरी परतलाच नाही. मुलं कुठे राहिली म्हणून घरच्यांचा जीव कासाविस झाला. नंतर जे समजलं ते ऐकताच क्षणी कुटुंबाच्या अक्षरश: पायाखालची जमीन सरकली. ही धक्कादायक घटना आळंद इथे घडल्याची माहिती मिळाली आहे. दिवाळीनंतरच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी अत्रिनंदन सकाळीच दोन मित्रांसह घराजवळच्या डोंगरावर गेला होता. पावसाने हिरवाई झाकलेल्या डोंगरावर तिघेही मस्ती, गप्पा आणि खेळात रमले होते.

मात्र निसर्गाने काही वेगळंच ठरवलं होतं. एका दगडावर बसलेला अत्रिनंदन अचानक खाली कोसळला. पावसामुळे दगडाखालची माती सैल झाल्याने तो मोठा दगड घरंगळत खाली गेला आणि त्याच्याखाली अत्रिनंदन चिरडला गेला. त्याच क्षणी बाकीचे दोन्ही मित्रही बाजूला फेकले गेले आणि जखमी झाले.अत्रिनंदनच्या अंगावरून दगड गेल्याने तो गंभीर जखमी झाला होता. रक्तबंबाळ अवस्थेत पडलेला अत्रिनंदन पाहून त्याच्या मित्रांनी आरडाओरड करत गावात मदत मागितली. काही गावकरी धावतच घटनास्थळी पोहोचले. सर्वांनी मिळून दगड हटवून अत्रिनंदनला बाहेर काढलं आणि तात्काळ रुग्णालयात दाखल केलं. मात्र संभाजीनगर येथे उपचार सुरू असतानाच आज पहाटेच्या सुमारास त्याने प्राण सोडले.

विविध वृत्त...

## कार्तिकी एकादशीच्या आधी पांडुरंगाच्या चरणी सोडला प्राण, पंढरपुरात प्रसिद्ध कीर्तनकारांचं निधन

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. दत्ताराम सीताराम नागप महाराज याचं शुक्रवारी पहाटे निधन झालं आहे. कार्तिकी एकादशी निमित्त ते पंढरपुरला आले होते. पांडुरंगाच्या चरणीच त्यांचं निधन झालं आहे. गुरुवारी रात्री त्यांनी कीर्तन केलं होतं. कीर्तनानंतर ते आपल्या निवासस्थानी परतले होते. त्यानंतर शुक्रवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली.

६० वर्षीय दत्ताराम सीताराम नागप महाराज हे वैभववाडी तालुक्यातील आखवणे पुनर्वसन गावठण येथील रहिवासी होते. शुक्रवारी पहाटे पंढरपूरात त्यांचं हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ''पांडुरंगाच्या नामस्मरणात रमलेल्या या वारकऱ्याने वारीतच शेवटचा श्वास घेतला. या घटनेने वैभववाडी तालुक्यासह संपूर्ण वारकरी संप्रदायात हळहळ व्यक्त होत आहे.

नागप हे आपल्या परिवारासह २९ ऑक्टोबर रोजी कार्तिकी वारीसाठी पंढरपुरला गेले होते. गुरुवारी रात्री त्यांनी कीर्तन सादर करून भगवान विठ्ठलाच्या चरणी वारी केली. त्यानंतर आपल्या निवासस्थानी परतल्यावर पहाटे त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. दत्ताराम नागप हे केवळ कीर्तनकार नव्हते, तर समाजकार्य, श्रद्धा आणि शांततेचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या वडिलांपासूनच कीर्तन परंपरेचा वारसा त्यांनी जपला होता.

मुंबईतील बेस्ट खात्यात ते अधिकारी होते. दोन वर्षांपूर्वी निवृत्त झाल्यानंतर ते पूर्णपणे समाजकार्यात गुंतले. ते अरुणा प्रकल्प संघर्ष कृती समितीचे मुंबई सरचिटणीस म्हणून कार्यरत होते. धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच अरुणा धरणग्रस्तांना सानुग्रह अनुदान मिळालं. तर आखवणे भोम व नागपवाडी पुनर्वसन गावठणाच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. शांत, संयमी, अभ्यासू व सेवाभावी व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख सर्वत्र होती.

## उमरखेड उपजिल्हा रुग्णालयात आता विनामूल्य डायलिसिस सुविधा

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे उमरखेड येथील ८ खाटांच्या मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

यामुळे उमरखेड आणि लगतच्या परिसरातील किडनी (मूत्रपिंड) आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध होणार असल्याने दिलासा मिळेल, असा विश्वास पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला.उमरखेड तालुक्यात कार्यरत असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात हे अत्याधुनिक डायलिसिस सेंटर स्थापन करण्यात आले आहे. परिसरातील रुग्णांची वाढती संख्या आणि उपचारांची गरज लक्षात घेऊन हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

यावेळी बोलताना पालकमंत्री श्री. राठोड म्हणाले की, ''या मोफत डायलिसिस सेंटरमुळे उमरखेड परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुलभ होणार आहे. आतापर्यंत रुग्णांना उपचारांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या शहरांमध्ये जावे लागत होते, ज्यामुळे त्यांना प्रवासाचा मोठा ताण सहन करावा लागत होता आणि उपचारांवरील आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. आता हे मोफत केंद्र सुरू झाल्यामुळे नागरिकांचा हा त्रास दूर होईल आणि त्यांना वेळेवर व सोयीस्कर मोफत उपचार मिळतील.''

याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. विकास मीना, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व परिचारिका उपस्थित होत्या. तसेच, उमरखेड येथे आमदार श्री. किसन वानखेडे, भाजपचे जिल्हा समन्वयक श्री. नितिन भुतडा, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मांडण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. डोंगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शिंदे, श्री. चितंगराव कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर तणाव वाढला; काळा दिन कार्यक्रमासाठी जाणाऱ्या शिवसैनिकांना कर्नाटक पोलिसांनी सीमेवर रोखले!

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** ''काळा दिन''आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात शनिवारी तणावाची परिस्थिती निर्माण झाली. बेळगाव आणि सीमाभागात आंदोलनात सहभागी होण्यासाठी निघालेल्या शिवसैनिकांना कर्नाटक पोलिसांनी सीमेवरच थांबवले, ज्यामुळे संतप्त शिवसैनिकांनी पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर ठिय्या आंदोलन केले.कर्नाटक राज्याची स्थापना १ नोव्हेंबर १९५६ रोजी भाषावार प्रांतरचनेनंतर झाली. हा दिवस मराठी भाषिक सीमाभागातील लोक दरवर्षी ''काळा दिन'' म्हणून पाळतात. बेळगाव, कारवार, निपाणी आणि इतर मराठीबहुल भागांवर कर्नाटकाचे वर्चस्व असल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन दरवर्षी केले जाते.

### बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांतील गोंधळ व संशयास्पद मतदारांच्या नोंदींसंदर्भात

# युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्यासोबत जयश्रीताई शेळके यांची चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांतील गोंधळ व संशयास्पद मतदारांच्या नोंदींसंदर्भात मुंबई येथे युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्यासोबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रवक्ता जयश्रीताई शेळके यांची सविस्तर चर्चा !

बुलढाणा विधानसभा मतदारसंघात मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असलेल्या बनावट नोंदी, एका मतदाराचे दुबार नावे, मोठ्या प्रमाणात मयत मतदारांची नावे, एकाच पत्त्यावर अनेक मतदारांची नोंद तसेच नियोजनबद्ध पद्धतीने मोठ्या प्रमाणावर केलेल्या मतचोरीच्या तक्रारींचा तपशील युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्यासमोर मांडण्यात आला.

यावेळी शिवसेना ॲड. जयश्रीताई शेळके यांनी बुलढाणा मतदारसंघातील सद्यस्थितीबाबत आदित्यजी ठाकरे यांना सविस्तर माहिती देऊन मतदार याद्यांतील विसंगती, बोगस नावे आणि दुबार नोंदींमुळे लोकशाही प्रक्रियेवर निर्माण झालेला संशय दूर करणं अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदान हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. त्यात फेरफार करण्याचा कुठलाही प्रयत्न लोकशाहीवर आघात आहे. त्यामुळे या गंभीर प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे औपचारिक निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून स्थानिक पातळीवरही जनआंदोलन तीव्र करण्यात येणार आहे.

शिवसेना सदैव जनतेच्या न्यायासाठी कटिबद्ध आहे. बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मतदारांचा आवाज दडपण्याचा कुठलाही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा ठाम विश्वास यावेळी युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे यांनी व्यक्त केला !



# जिल्ह्यातील गोरगरीबांसाठी पक्की घरे हेच ध्येय – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : एकही व्यक्ती स्वत:च्या पक्क्या घरापासून वंचित राहू नये हा शासनाचा निर्धार आहे. ज्या गोरगरिबांना गतकाळात कुठेच आसरा मिळाला नाही अशा लोकांनी आडवळणी असलेल्या झुडपी क्षेत्रात आसरा घेतला आहे. यातील १९९६ पूर्वीपासून असलेल्या ज्या व्यक्तींकडे पुरावे आहेत ते लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही परिस्थितीत या लोकांना मार्चपूर्वी पट्टे वाटप करण्याचे निर्देश महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजनेसह शासनाच्या इतर योजनांचा समन्वय साधून अधिकाधिक लोकांना घरे देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून सुमारे ३० लाख घरे प्रधानमंत्री आवास योजनेत उपलब्ध असल्याचे ते म्हणाले.

नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या महसूल विभागाच्या विभागीय आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस वित्त व कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार चरणसिंग ठाकुर, आमदार संजय मेश्राम, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, अपर आयुक्त डॉ. माधवी खोडे-चवरे, अतिरिक्त आयुक्त तेजूसिंग पवार, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक नरेश झुरमुरे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, गडचिरोली जिल्हाधिकारी अविशांत पंडा, वर्धा जिल्हाधिकारी वान्मथी सी, भंडारा जिल्हाधिकारी सावन कुमार, गोंदिया जिल्हाधिकारी प्रजित नायर, चंद्रपूर अतिरिक्त जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे व वन विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सर्वसामान्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी नैसर्गिक न्यायाच्या भूमिकेतून आपण पट्टे वाटपाचा निर्णय घेतला. हजारो गोरगरिबांना त्यांच्या मालकीचे पट्टे



यातून मिळाले. झुडपी क्षेत्रामध्ये गत अनेक वर्षापासून लोक वास्तव्यास आहेत. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार पात्र व्यक्तींना प्रत्येक तालुक्यात कालमर्यादेत तहसिलदारांनी कार्यवाही केली पाहिजे. येत्या काळात निवडणुकांच्या कामकाजासह या कामांनाही तेवढेच प्राधान्य सर्व महसूल यंत्रणेने देणे आवश्यक आहे. विधानसभेमध्ये याबाबत व्यापक चर्चा झाली असून कोणत्याही स्थितीत प्रशासकीय पातळीवरची दिरंगाई खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला.

नुकत्याच झालेल्या नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांना सावरता यावे यासाठी शासनाने तातडीने पंचनामे पूर्ण करुन मदतीचा निर्णय घेतला. विदर्भातील धान उत्पादक पट्ट्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यातील धान उत्पादक शेतकरी पंचनाम्यापासून जर सुटले असतील तर अशा शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करुन त्याबाबत शासनाला सादर करा. कोणताही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहता कामा नये, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व अधिकाऱ्यांना सांगितले. सर्वसामान्यांना घरासाठी सहज व सुलभ पद्धतीने वाळू उपलब्ध व्हावी यासाठी आपण नवे वाळू धोरण जाहीर केले. यात विविध घाटांच्या लिलावात पारदर्शकता आणली आहे. जे वाळू घाट निश्चित करण्यात आले आहेत त्या वाळूघाटाच्या एकूण उपलब्ध वाळूच्या दहा टक्के वाळू ही घरकुलासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारची व कुठेही सामान्य व्यक्तीची अडवणूक होणार नाही असा शासन निर्णय आपण जाहीर केला आहे. एवढे सारे स्पष्ट असताना वाळूबाबत कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने गैरप्रकार केल्याचे आढळल्यास सेवा समाप्त करु असा इशारा त्यांनी दिला.

शहरी भागासह ग्रामीण भागातील महिलांना विकासाच्या प्रवाहात आणता यावे यासाठी नागपूर मधील सुमारे ८ हजार महिला बचत गटांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे खेळते भांडवल आपण देण्याचा निर्णय घेतला. यातील १६०० बचत गटांना आपण पहिल्या टप्प्यात निधी वितरणास दोन दिवसापूर्वी शुभारंभ केला. याच धर्तीवर इतर जिल्ह्यांमध्ये सुमारे दोन हजार बचत गटांना प्रत्येकी एक लाख रुपये भांडवलासाठी देण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. रस्ते व इतर विकास कामा इतकेच बचत गटांना स्वयंरोजगाराचे मार्ग भक्कम करुन देणे महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन वेळप्रसंगी जिल्हा वार्षिक योजनेतूनही यासाठी तरतूद करण्याबाबत त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेची आवश्यकता लक्षात घेऊन याबाबत आढावा घेतल्याचे त्यांनी सांगितले.

महसूल विभागात गत अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या बढत्यांचा प्रश्न प्रशासकीय पातळीवर मार्गी लावून यात अत्यंत पारदर्शकतेने निर्णय प्रक्रियेबद्दल महसूल अधिकारी संघटनेच्यावतीने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार करण्यात आला. तहसिलदारांपासून अपर जिल्हाधिकारी व भारतीय प्रशासकीय सेवेच्या बढतीपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण केल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## महापालिका कर्मचारी, निवृत्तीवेतनधारकांच्या महागाई भत्यात वाढ; महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरून ५८ टक्के

**मुंबई/प्रतिनिधी** : शासननिर्णयाप्रमाणे १ जुलैपासून महागाई भत्यात ५५ टक्क्यांवरून ५८ टक्के वाढ करण्यात आली असून त्यानुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात सुधारणा करण्यात आली आहे. संबंधित महागाई भत्ता हे महानगरपालिका समय वेतनश्रेणीतील पूर्णकालिक कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक कुटुंब निवृत्तीवेतनधारक, वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवर्गातील कर्मचारी, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीत वेतन घेणारे अध्यापकीय कर्मचारी यांना अनुज्ञेय असेल. मात्र, माध्यमिक शाळा संहितेनुसार वेतन अनुज्ञेय असणाऱ्या माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असणार नाही.

सुधारित महागाई भत्याची ऑक्टोबर या महिन्यासाठीची आकारणी, जुलै ते सप्टेंबर या महिन्यांच्या थकबाकीसह, संबंधित कर्मचाऱ्यांच्या, निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या ऑक्टोबरच्या मासिक वेतनपत्रकात देण्याबाबतची कार्यवाही मानव संसाधन विभागामार्फत करण्यात येणार आहे. महागाई भत्याची रक्कम परिगणित करताना सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन विचारात घेण्यात येणार आहे. विशेष भत्ता किंवा इतर कोणत्याही नावाने वेतनात समाविष्ट होणारी रक्कम विचारात घेण्यात येणार नाही. महागाई भत्याची रक्कम परिगणित करताना ५० पैसे किंवा त्याहून अधिक येणारी रक्कम पुढील रुपयात पूर्णांकित करण्यात येणार आहे.

दरम्यान, ५ – ७ व्या वेतन आयोगानुसार, महागाई भत्ता देय करण्यासंदर्भात यापूर्वी निर्गमित परिपत्रकांमधील टीप-१ मध्ये नमूद असलेली बाब 'तथापि, व्यवसायरोध भत्ता असल्यास सुधारित वेतन व व्यवसायरोध भत्ता यांच्या एकत्रित रकमेवर महागाई भत्ता आकारण्यात येण्याची बाब वगळण्यात आली आहे.

# दहावी-बारावी परिक्षा वेळापत्रक जाहीर; फेब्रुवारीत होणार परिक्षा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. प्रायोगिक परीक्षा जानेवारी आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये घेतल्या जातील. अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२५ आहे.

बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होऊन १८ मार्चपर्यंत चालणार आहे. दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होऊन १८ मार्च २०२६ रोजी संपणार आहे. बारावीच्या प्रायोगिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यांकन परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात येणार आहेत. या काळात विज्ञान शाखेच्या प्रायोगिक परीक्षा, वाणिज्य शाखेतील प्रोजेक्ट मूल्यांकन आणि कला शाखेतील तोंडी परीक्षा पूर्ण करण्यात येतील. दहावीच्या प्रायोगिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यांकन परीक्षा २ फेब्रुवारी ते बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडतील.

या दरम्यान शारीरिक शिक्षण, आरोग्यशास्त्र, गृहशास्त्र अंतर्गत आणि कला विषयांच्या मूल्यांकन परीक्षा शाळास्तरावर घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी त्यानुसार तयारी करून वेळेचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विषयवार वेळापत्रक आणि सूचना मंडळाच्या ै.स्रप्र्प्ेम्दरी्.ग्ह या संकेतस्थळावर पाहता येतील, अशी माहिती मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी दिली.

अतिविलंब शुल्कासह अंतिम मुदत जाहीर

शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी पात्र विद्यार्थ्यांसाठी नोंदणी अर्ज क्रमांक १७ सादर करण्यासंदर्भात महत्त्वाची सूचना जाहीर केली आहे. अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याचा कालावधी १ नोव्हेंबर २०२५ ते ३१ नोव्हेंबर २०२५ पर्यत आहे. अतिविलंब शुल्क म्हणून प्रति विद्यार्थी प्रति दिवस २० रुपये आकारण्यात येणार आहे. या कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीनेच करावी लागेल. यासाठी ु.ारहरहींललेरीव.ळप या वेबसाइटवर आवश्यक सर्व सूचना, माहितीपत्रक आणि मार्गदर्शक पुस्तिका उपलब्ध आहे.

# शिवप्रेमींवर व सर्वसामान्य नागरीकांवर लाठीचार्ज करणाऱ्या हुकूमशाही पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच प्रशासकीय अधिकारी यांचे तात्काळ बदली करा

## शिवसेना, उमरखेड शिंदे गट यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळील लीज संपुष्टात आलेला अतिक्रमणकारक पेट्रोल पंप हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ असल्याने पेट्रोल पंपासारख्या ज्वलनशील पदार्थाच्या विक्री व साठ्वणीकीमुळे भविष्यात महाराजांच्या पवित्र पुतळ्यास धोका निर्माण होऊ शकतो, हे वास्तव प्रशासनाला समजत नाही का?असा प्रश्न शिव सेना कडून निर्माण करण्यात आला असून सदर पेट्रोल पंपामळे आज महाराजांचा पुतळा नागरिकांच्या नजरेपासून झाकला




जात आहे, ही प्रत्येक शिवभक्ताच्या मनाला वेदना देणारी बाब असताना प्रशासन व लोकप्रतिनिधीनी या गंभीर मुद्द्याकडे कानाडोळा करून तात्काळ हटविण्याची मागणी करणाऱ्या रमेशभाऊ चव्हाण हे मागील अनेक दिवसांपासून कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करत असताना.उमरखेड प्रशासनाने त्यांच्या न्याय्य मागणीचा विचार न करता हकूमशाही पद्धतीने व अधिकाराचा गैरवापर करुन पोलीस प्रशासनास हाताशी धरुन कार्यवाही केली आहे.

हा प्रकार लोकशाहीला काळिमा फासणारा असून शिवसेना (शिंदे गट) उमरखेड यांच्या वतीने या हुकूमशाही व अन्याय्यकारक कार्यवाहीचा तीव्र निषेध करीत असून, प्रशासनाने तात्काळ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सुरक्षित आणि सुस्पष्ट दिसेल अशा स्थितीत आणावा, संबंधित पेट्रोल पंप हटविण्याची प्रक्रिया त्वरित सरू करावी, तसेच हुकुमशाही पद्धतीने शिवप्रेमींवर व सर्वसामान्य नागरीकांवर लाठीचार्ज करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच प्रशासकीय अधिकारी यांचे तात्काळ स्थलांतर करुन योग्य ती कारवाई करण्यात यावी अन्यथा संबंधीतांविरुद्ध त्वरीत कारवाई न झाल्यास शिवसेनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उपविभागीय अधिकारी , उपविभागीय अधिकारी कार्यालय, मार्फत देण्यात आले यावेळी निवेदन देताना ॲड. संजीवकुमार जाधव, शहर प्रमुख, उमरखेड,अतुल, अजय पाईकराव, दामोदर इंगोले आणि शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.